MHBU150008582022

## <u>निशाणी क्रमांक १९ खालील आदेश</u>

सदरचा अर्ज प्रतिवादी यांनी आदेश ६ नियम १७ सी.पी.सी. प्रमाणे लेखी जवाबामध्ये अनुषंगी दुरूस्ती करण्याची परवानगी मिळण्यासाठी केला आहे.

०२. प्रतिवादी यांनी असे कथन केले आहे की, वादीने दाव्यामध्ये दुरुस्ती केलेली आहे. त्यामुळे प्रतिवादी त्यांचे लेखी जवाबात अनुषंगी दुरुस्ती करणे आहे म्हणुन लेखी जवाब कलम क १० नंतर 'अर्जदार याने प्रस्तुतची मालमत्ता ......... नुकसान होईल' हा संपुर्ण मजकुर खोटा बनावट काल्पनिक आहे. सबब, तो विशेषतः नाकबुल असा दुरुस्ती मजकुर समाविष्ट करणे आहे. त्याकामी प्रतिवादीने प्रस्तुतचा अर्ज दाखल केला आहे.

०३. वादीने नि.क्र. २० वर से दाखल करुन अर्जास विरोध केला आहे. त्यानंतर त्यांनी असे कथन केले की, ज्या मजकुराबाबत दुरुस्ती करणे आहे. सदर मजकुराची कल्पना प्रतिवादी यांना यापुर्वी होती. त्यामुळे प्रतिवादी अर्ज दाखल करतांना स्वच्छ हाताने न्यायालयासमोर आला नाही. करीता अर्ज नामंजुर करण्याची विनंती केली आहे.

०४. अर्जाचे अवलोकन केले. अभिलेखावरील दाखल दस्तऐवज व रोजनामा यांचे अवलोकन केले. प्रतिवादीच्या अर्जात नमुद कारण की, वादीने दाव्यामध्ये दुरुस्ती करुन कलम क १० नंतर काही मजकुर समाविष्ट केलेला आहे. त्यामुळे प्रतिवादीस त्यांच्या लेखी जवाबात अनुषंगी दुरुस्ती करणे आहे व वादीने केलेली दुरुस्ती नाकबुल आहे. असा उल्लेख त्यांच्या लेखी जवाबात करणे आहे.

प्रतिवादी हे वादीने दाव्यात केलेल्या दुरुस्तीच्या अनुषंगाने दुरुस्ती करीत आहे. त्यामध्ये दाव्याच्या मुळ स्वरुपात बदल होत नाही किंवा नवीन मुद्दा देखील उपस्थित होत नाही. जर अर्ज नामंजुर झाल्यास प्रतिवादीचे लेखी जवाबामध्ये पक्षकथन अपुर्ण राहिल. परिणामी प्रतिवादी हे वादीच्या दाव्यास सक्षमपणे प्रतिकार करुन शकणार नाही. त्यामुळे प्रतिवादीचे नुकसान होण्याची शक्याता नाकारता येणार नाही. याउलट अर्ज मंजूर झाल्यास वादीचे कोणतेही नुकसान होत नाही. तसेच सदरील दुरूस्तीमुळे दाव्याचे स्वरूप बदलत नाही. सदरील अर्जामुळे दाव्यात विलंब झाला आहे. त्यामुळे सदरचा विलंब प्रतिवादीवर खर्चाची रक्कम बसविल्याने भरून काढता येईल. एकंदरित वरील सर्व चर्चेनूसार प्रतिवादीचा अर्ज न्यायाच्या दृष्टीने मंजूर करणे आवश्यक आहे. म्हणून मी पूढील आदेश पारित करित आहे.

## आ दे श

०१. प्रतिवादीचा अर्ज (नि.क्र. १९) मंजुर करण्यात येतो.

०२. प्रतिवादीने खर्चाची रक्कम रूपये २००/– वादीला द्यावी.

०३. प्रतिवादीने अर्जातील विनंतीप्रमाणे लेखी जवाबामध्ये दूरूस्ती करावी व दूरूस्तीप्रत आदेश झाल्या तारखेपासून १४ दिवसांच्या आत दाखल करावी.

स्वा/–

दिनांक १४.०७.२०२५

**(श्री. हसीम मो. बेग)**
सह दिवाणी न्यायाधीश, क. स्तर,
देऊळगांव राजा.

# <u>प्रमाणपत्र</u>

मी, खात्रीपूर्वक कथन करतो की, पी.डी.एफ. फाईलमधील न्यायनिर्णयाचा संपूर्ण मजकूर हा मूळ न्यायनिर्णयाप्रमाणे शब्दशः तंतोतंत व बरोबर आहे.

| | |
|---|---|
| कनिष्ठ लिपीकाचे नाव | –के. ए. बोरोकार |
| न्यायालयाचे नांव | – सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर, देऊळगांव राजा |
| दिनांक | – १५.०७.२०२५ |